आय. ए. नं. ०३/२०१९
नियमित दि. मुकदमा नं.५६८/२०१८
प्रसन्न गव्हाणे वि. दादासाहेब पवार

## :: नि.क्र. ५ खालील आदेश ::
## (पारित दि. १४.०८.२०१९)

०१ सदरचा अर्ज वादींनी प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त ताकिदीकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

०२ वादींच्या कथनानुसार, मौजे गादेगांव तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर येथील शेत जमीन गट नं. ६८४ पैकी उत्तर बाजुची क्षेत्र ३० आर यांसी चतुःसिमा पुर्वेस – गट नं. ३८०, दक्षिणेस – गट नं. ६८४ पैकी उर्वरित जमीन, पश्चिमेस – गट नं. ६८३ व उत्तरेस – गट नं. ६८५. सदर मिळकतीचे वर्णन सविस्तरपणे दाव्याच्या परिच्छेद क्र.१ मध्ये दिलेले आहे. यानंतर त्यास दावा मिळकत असे संबोधण्यात येईल.

०३ वादीच्या कथनानुसार वाद मिळकत वादीने द्वारकाबाई दिगंबर मलपे यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखताद्वारे विकत घेतलेली मिळकत आहे. प्रतिवादीचा सदर मिळकतीशी कोणताही संबंध नाही. प्रतिवादी व त्याचे वडील भागवत पिराजी पवार हे वादीच्या दावा मिळकतीवरील मालकी हक्कास व ताब्यास सन २०१५ मध्ये हरकत अडथळा करु लागले म्हणून वादीने प्रतिवादी व त्यांचे वडीलांविरुध्द नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४४३/२०१५ हा निरंतर मनाई हुकूमाकरिता दाखल केला होता. त्यामध्ये

अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश वादीच्या बाजुने मंजूर झाला होता. सदर निकालाविरुध्द जिल्हा न्यायालयात अपील क्र. ३२/२०१६ दाखल केले होते. परंतू सदरचे अपीलही रद्द करण्यात आले होते. परंतू, त्यानंतर नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४४३/२०१५ हा वादी गैरहजर असल्यामुळे काढून टाकण्यात आला. वादीने दावा मिळकतीमध्ये सन २०१७–२०१८ या वर्षात विहिरीच्या पाण्याच्या सहाय्याने ८६०३२ या उसाच्या जातीची लागवण केलेली आहे व तो ऊस गळीतासाठी परीपक्व झालेला असून उभा आहे. त्यास कारखान्याकडून ऊसतोड आलेले आहे. वादी हा शिक्षणनानिमित्त बाहेर गावी राहत असून, वाद मिळकत ही तो त्याच्या मामाच्या सहाय्याने वहीती करतो. वादी व त्याचे मामा वाद मिळकतीमध्ये ऊसाचे पीक कारखान्यास घालण्यासाठी रस्त्याची दुरुस्ती करत असताना २२.१२.२०११ पासून प्रतिवादी हा त्यांना हरकत अडथळा निर्माण करुन लागला. तसेच वादीचा नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४४३/२०१५ हा न्यायालयाने काढून टाकल्यामुळे प्रतिवादीने वादीस व त्याच्या मामास दावा मिळकतीतून असलेल्या रस्त्यातून ऊसाचे पीक बाहेर काढण्यास हरकत घेतली. वादीने प्रतिवादीला समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता, प्रतिवादी वादीस म्हणाला की, कोर्टाने तुमचा दावा काढून टाकलेला आहे, निकाल माझ्यासारखा झाला आहे, जमीन माझी आहे, मी ऊस नेऊ देणार नाही अशी भाषा वापरुन वादीच्या वाद मिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळा निर्माण केला. त्यामुळे वादीस मुळ दावा व प्रस्तुत मनाई हुकूमाचा अर्ज दाखल करण्यास कारण घडलेले आहे.

**०४** प्रस्तुंत प्रकरणी प्रतिवादीने त्याचे म्हणणे नि.क्र. १४ वर दाखल केले आहे.

प्रतिवादीच्या कथनानुसार वादी यांनी प्रतिवादींविरुध्द खोटया मजकूराचा अर्ज न्यायालयात दाखल केला आहे, तसेच प्रतिवादी यांनी वादीच्या अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीने दावा मिळकतीच्या दिलेल्या चतुःसिमा चुकीचे आहेत. त्यामुळे दावा कायदयाने चालणार नाही. प्रतिवादीने असे कथन केले की, मौजे गादेगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील जमीन गट नं. ६८४ क्षेत्र ०१ हे. १२ आर ही संपूर्ण जमीन प्रतिवादीचे मयत वडिल भागवत पिराजी पवार यांच्या मालकीची होती. द्वारकाबाई दिगंबर मलपे ही भागवत पवार यांची बहिण आहे. द्वारकाबाईने सन १९८८ साली दावा मिळकतीमधील हक्क सोडून दिलेला होता. भागवत पवार हा दि. ०६.०३.२०१७ रोजी मयत झाला आहे. हक्कसोड पत्र व प्रतिज्ञा पत्राद्वारे द्वारकबाईचा दावा मिळकतीवरुन कमी झालेला आहे. तेंव्हापासून भागवत पवार व त्याचे कुटुंबासह दावा मिळकत वहिवाटीत आहे. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, प्रापंचिक अडचणीमुळे प्रतिवादीचे वडिल भागवत हा सन २००९ साली द्वारकाबाईकडून रु. ५०,०००/– हातऊसने घेतले होते. त्या बदल्यात प्रतिवादीचे वडिल भागवत पवार यांनी दि. १९.०६.२०१९ रोजी द्वारकाबाईच्या नांवे बक्षीस पत्र करुन दिले. परंतु, दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा द्वारकाबाईला कधीही मिळालेला नव्हता व नाही. द्वारकाबाईच्या सांगण्याप्रमाणे भागवत यांनी रक्कम रु. ५०,०००/– तिचा मुलगा दिगंबर मलपेच्या खातेवरत जमा केलेली आहे. भागवत पवार यांनी द्वारकाबाई मलपेच्या नांवाने करुन दिलेला बक्षीस पत्र अद्यापर्यंत रदद झालेला नाही. भागवत पवार व द्वारकाबाईचे मुले यांच्यामध्ये अंतर्गत मतभेद झाल्यामुळे, द्वारकाबाईने तिच्या मुलाच्या सांगण्यावरुन दावा मिळकत ही द्वारकाबाईचा मुलीचा मुलगा प्रसन्न गव्हाणे

म्हणजे वादीच्या नांवे विक्री केल्याबाबतचा तथाकथीत, पोकळ, बनावट बिनभरण्याचा खरेदी दस्त दि. २६.१२.२०१४ रोजीचा अस्तित्वात आणलेला आहे. सदर दस्ताच्या आधार दावा मिळकतीचा वादीला कब्जा कधीही प्राप्त झालेला नाही. सदर खरेदी दस्ताच्या आधारे दावा मिळकतीवर वादीचे नांव लागलेले आहे. त्या विरुध्द भागवत पवार यांनी अपील दाखल केलेले आहे. प्रतिवादीचे वडिल भागवत पवार हे दि. ०६.०३.२०१७ रोजी मयत झालेले आहे. त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी व त्याची सावत्र आई व भाऊ यांची नांवे गट नं. ६८४ चे ७/१२ पत्रकी झालेल्या आहेत.

**०५** प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादीच्या वडिलांनी द्वारकाबाईकडून घेतलेली संपूर्ण रक्कम परत फेड केलेली आहे. द्वारकाबाई हिच्या नांवे करुन दिलेला बक्षिस पत्र बेकायदेशीर व रददबातल आहे. वादी व द्वारकाबाई यांनी संगनमताने आणलेला दि. २६.१२.२०१४ रोजीचा खरेदी दस्त रददबातल व बेकायदेशीर आहे. वादी व त्याचे आई वडिल सन १९९५ पासून रत्नागिरी येथे राहत आहेत. वादी हा शेतकरी नाही त्यामुळे त्याला खरेदी दस्त करण्याचा अधिकार नाही. वादी दाव्यातील पत्यावर राहत नाही. दावा मिळकतीमधील ऊस कधीही वादीच्या नांवे गेलेला नाही. याउलट प्रतिवादीचे मयत वडिल भागवत पवार यांच्या नांवे पांडुरंग सह. कारखान्याकडे गेलेला आहे. यावरुन दावा मिळकतीवर वादीचा कब्जा नाही. प्रतिवादी यांनी कथन केले की, सदरचा खोटा अर्ज वादीने प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे. प्रतिवादीनी सदरील अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली आहे.

०६ दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

०७ सदरील प्रकरणाचे अभिलेखाचे अवलोकन केले. दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन करुन खालील मुद्दे माझ्या विचाराधीन आले आहेत. सदरील मुद्दयांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रथम दर्शनी दाव्यात वादीची बाजू असल्याचे वादी हे सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| २ | अनुकलतेचा कल हा वादीच्या बाजूने आहे काय ? | होकारार्थी |
| ३ | तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे निरसन न करता येणारे नुकसान होणार आहे काय | होकारार्थी |
| ४ | काय आदेश? | अंतिम आदेशानुसार |

## :: कारणमिमांसा ::

०८ वादीतर्फे प्रस्तुत प्रकरणात अभिलेखावर दावा मिळकतीचा दि. २४.१२.२०१८ रोजीचा ७/१२ उतारा, दि. २६.१२.२०१४ रोजीचे वादी व द्वारकाबाई मलपे यांच्यामध्ये झालेले दावा मिळकतीचे नोंदणीकृत खरेदी खताची प्रत, नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४४३/२०१५ मधील वादपत्र व त्यावर झालेल्या दि. १२.०६.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत, नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४४३/२०१५ मध्ये दाखल असलेल्या तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज नि. नं. ५ व त्यावरील दि. ०२.०४.२०१६ रोजी

पारित झालेल्या आदेशाची प्रत. मा. जिल्हा न्यायाधीश यांची किरकोळ सिव्हील अपील नं. ३२/२०१६ मधील न्यायनिर्णयाची प्रत, पांडुरंग सहकारी साखर कारखाना यांनी दिलेले दि. १६.०१.२०१९ रोजीचा दाखला, साक्षीदार दादासाहेब बिडवे, मधुकर बागल, पांडुरंग बागल, द्वारकाबाई मलपे, अण्णा मलपे यांची प्रतिज्ञा पत्रे इत्यादी कागदोपत्री पुरावा वादीतर्फे अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे.

**०९** याउलट प्रतिवादीतर्फे कागदपत्रांची यादी नि. नं. १९ नुसार वाद मिळकतीचा सन २००२ ते २०१७ कालावधीतील ७/१२ उतारा, दि. ०८.०१.२०१९ रोजीचा वाद मिळकतीचा ७/१२ उतारा, प्रतिवादीने पांडुरंग सहकारी साखर कारखाना यांना ऊस नोंदणीचा दाखला मिळणेबाबत दिलेल्या अर्जाची प्रत, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बॅंकेमधील भागवत पवार यांच्या खात्याचा खाते उतारा, दि. १७.०१.२०१९ रोजीचा पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचा दाखला, साक्षीदार अभिमान पवार, भारत बागल, राजेंद्र पाकळे, गजानन बागल, विलास बागल यांची प्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आलेली आहे. तसेच प्रतिवादीतर्फे कागद पत्राची यादी नि. क्र. २५ नुसार नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४४३/२०१५ मध्ये नि. क्र. ३४ नुसार दाखल असलेल्या साक्षीदारांचे प्रतिज्ञापत्रे अभिलेखावर दाखल करण्यात आलेली आहे. दि. २९.०१.२०१९ रोजीचा पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचा दाखला इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्यात आलेली आहेत.

<u>मुद्या क्र. १ करिता</u> :-

१० प्रस्तत प्रकरणात वादीचे असे कथन आहे की, त्यांने वाद मिळकत ही नोंदणीकृत खरेदी खताद्वारे द्वारकाबाई दिगंबर मलपे यांच्याकडून विकत घेतलेली मिळकत आहे. यापूर्वी देखील प्रतिवादी व त्यांचे वडिल यांनी वादीच्या वाद मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस व रस्त्यास अडथळा निर्माण केल्यामुळे वादीने नियमित दिवाणी दावा क्र. ४४३/२०१५ हा प्रतिवादीविरुध्द दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये न्यायालयाने अंतरिम मनाई हुकुमाचा वादीचा अर्ज मंजूर केला होता. तद्नंतर, तो दावा वादी हजर न राहिल्यामुळे काढून टाकण्यात आला. प्रतिवादीने दिवाणी दावा क्र. ४४३/२०१५ मधील पारित झालेल्या अंतरिम मनाई हुकुमाच्या अर्जाविरुध्द जिल्हा न्यायालयामध्ये अपील दाखल केले होते. परंतु, सदरचे अपिल देखील नामंजूर झालेले आहे. प्रतिवादी हा वादीचा दावा न्यायालयाने काढून टाकल्यामुळे वादीच्या वाद मिळकतीवरील ताब्यास वहितीस अडथळा निर्माण करत आहे व वादीने वाद मिळकतीत लावलेला ऊस हा कारखान्याकरिता घेवून जाण्यास प्रतिवादींतर्फे हरकत अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे वादीस २२ डिसेंबर २०१८ पासून दावा दाखल करण्यास कारण घडलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द अंतरिम मनाई हुकूम पारित करण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आलेली आहे.

११ प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीचे असे कथन आहे की, वाद मिळकतीचा ताबा हा वादीच्या वडिलांनी कधीही द्वारकाबाई मलपे किंवा प्रस्तुतच्या वादीला दिलेला नाही. प्रतिवादीचे वडिल यांनी द्वारकाबाई मलपे यांच्याकडून रक्कम रु. ५०,०००/- हात ऊसने

घेतले होते व त्या व्यवहारापोटी बहिण या नात्याने द्वारकाबाई हिला बक्षिस पत्र करुन दिले होते. सदरची रक्कम रु. ५०,०००/– हे प्रतिवादीच्या वडिलांनी द्वारकाबाईला परत दिलेले आहेत. परंतु, सदर बक्षिस पत्र हे रदद् करुन घेण्याचे राहिलेले आहे. वादी व त्यांची आजी द्वारकाबाई यांच्यामध्ये झालेला खरेदी खताचा व्यवहार हा बेकायदेशीर असून तो विनामोबदला आहे. वादीचा वाद मिळकतीवर ताबा नाही. तसेच कोर्ट कमिशनरमार्फत केलेल्या पाहणीमध्ये वाद मिळकतीवर प्रतिवादीचा ताबा असल्याची बाब अभिलेखावर आलेली आहे. त्यामुळे वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**१२** वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी असलेली कथने विचारात घेतली. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद देखील विचारात घेतला. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे काळजीपूर्वक वाचन केले असता, त्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादीचे वडिल व द्वारकाबाई मलपे यांच्यामध्ये बक्षिस पत्राचा व्यवहार झाल्याची बाब ही प्रतिवादीने त्याच्या लेखी कैफियतीमध्ये मान्य केलेली आहे. सदरचा दस्त हा नोंदणीकृत दस्त आहे. तसेच द्वारकाबाई हिने वादीच्या नांवे दिनांक २६.१२.२०१४ रोजी खरेदी खत करुन वाद मिळकत ही हस्तांतरित केल्याची बाब ही प्रतिवादीने मान्य केलेली आहे. त्यामुळे आज रोजी सदर मिळकतीवर कोणाचा ताबा आहे हे पाहणे आवश्यक आहे. वादीने अर्जामध्ये केलेल्या कथनाच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर दाखल केलेले नोंदणीकृत खरेदी खताची प्रत पाहिली असता त्यामध्ये दावा मिळकतीचे वर्णन दिलेले असून सदर खरेदी दिलेल्या

जमीनीमध्ये येणे जाणेसाठी, पिकाची वाहतुक करण्यासाठी, पश्चिम बाजूने दक्षिणोत्तर चालीचा सामाईक रस्ता व सदर गटातील चालू पाण्याची विहीर त्यावरील पाच अश्वशक्तीची इलेक्टीक मोटार, पाईप लाईन या सर्वामध्ये संपूण १/३ हिस्सा हा द्वारकाबाई मलपे हिने वादीच्या नांवे दिल्याचे खरेदी खतात नमूद केलेली आहे. तसेच दिनांक २६.१२.२०१४ रोजी सदर मिळकतीचा ताबा हा देखील वादीला दिल्याचे त्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. तसेच अभिलेखावर दाखल असलेली वाद मिळकतीचे ७/१२ उतारे पाहिले असता त्यावर देखील वादीच्या नांवाची धारक व ताबेदार म्हणून नोंद असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. प्रतिवादीच्या वडिलांनी फेरफार क्र. ६५७२ चे विरुध्द उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांच्या न्यायालयात अपील दाखल केले होते व त्याबाबतच्या निकालाची प्रत वादीतर्फे निशाणी क्र. ४४ वर दाखल करण्यात आलेली असून सदरचे अपील हे फेटाळण्यात आलेली आहे व मंडलअधिकारी, भंडीशेगांव यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे.

**१३** प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादीतर्फे पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे ऊस नोंदणीबाबत व ऊस बिलाबाबतचे दाखले अभिलेखावर दाखल केलेले आहेत. सदर दाखल्यांवरुन वादी व प्रतिवादीच्या गट नं. ६८४ मध्ये ऊसाचे पिक असल्याची बाब निदर्शनास येते. परंतु, सदरची बिले ही वादी किंवा प्रतिवादी यांचा दावा मिळकतीवर कशाप्रकारे ताबा आहे हे दर्शविण्याकरिता उपयोगी ठरत नाहीत. अभिलेखावर यापूर्वी दाखल करण्यात आलेल्या दिवाणी दावा क्र. ४४३/२०१५ मधील नि. क्र. ५ वरील पारित केलेल्या आदेशात असे नमूद केलेले आहे की, द्वारकाबाई मलपे हिच्या नांवे दिनांक १९.०६.२००९

रोजी नोंदणीकृत बक्षिस पत्र लिहून दिल्याचे दिसून येते. द्वारकाबाई हिने दिनांक २६.१२.२०१४ रोजी वादीस खरेदी खत करुन दिल्यामुळे प्रथमदर्शनी वादीचा वाद मिळकतीवर ताबा आहे. तसेच मा. जिल्हा न्यायाधीश यांनी अपील क्र. ३२/२०१६ मध्ये दिनांक ०१.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णयामध्ये देखील वादीचा वाद मिळकतीवर ताबा असल्याची बाब नमूद करुन प्रतिवादीतर्फे करण्यात आलेले अपील फेटाळलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात द्वारकाबाई मलपे यांनी स्वतःचे प्रतिज्ञा पत्र सादर करुन वाद मिळकतीचा ताबा हा त्यांनी वादीला खरेदी खताद्वारे दिला असल्याचे स्पष्टपणे मान्य केलेले आहे. याउलट प्रतिवादीने वादी व द्वारकाबाईमध्ये झालेला व्यवहार हा कसा बेकायदेशीर आहे हे दर्शविण्याकरिता कोणत्याही प्रकारचा पुरावा दिलेला नाही. तसेच प्रतिवादीचे वडिल व द्वारकाबाई मलपे यांच्यामध्ये झालेला बक्षिस पत्राचा व्यवहार हा कसा बेकायदेशीर होता याबाबत तोंडी शब्दा शिवाय इतर कोणताही दस्त अभिलेखावर सादर केलेला नाही. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादीने वाद मिळकतीमधील ऊसाचे क्षेत्रास सामाईक क्षेत्रातील विहीरीतून पाणी दिल्याचे दर्शविण्याकरिता विद्युत बिले सादर केलेली नाहीत. त्यामुळे वादीचा वाद मिळतीवर ताबा नसल्याचे दिसून येते. प्रतिवादीच्या वकीलांचा सदर युक्तीवाद व अभिलेखावर दाखल असलेली खरेदी खत व त्यामधील मजकूर विचारात घेतले असता गट नं. ६८४ मधील असलेल्या विहीरीत द्वारकाबाई यांचा १/३ हिस्सा त्याच्यासोबत त्यावरील मोटार व पाईप लाईनमध्ये देखील १/३ हिस्सा असल्याची बाब नमूद केलेली आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी वादीच्या नांवे स्वतंत्र विज बिल अथवा मोटार कनेक्शन असल्याचे वादीचे लेखी कथन नाही. त्यामुळे सदर

युक्तीवादामध्ये तथ्य असल्याचे दिसून येत नाही. प्रस्तुत प्रकरणात न्यायालयामार्फत न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती ही केवळ वाद मिळकतीवरील ऊसाचे पिक नाशवंत असल्यामुळे ते कारखान्याला पाठविण्याकरिता करण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणात न्यायालयीन आयुक्तांनी दाखल केलेला अहवाल हा वाद मिळकतीवर असलेल्या ताब्याबाबत त्यामध्ये कांहीही नमूद करण्यात आलेले नाही. तसेच वादी व प्रतिवादीतर्फे दाखल करण्यात आलेले साक्षीदारांचे प्रतिज्ञा पत्रे देखील आज रोजी विचारात घेता येणार नाही. अभिलेखावर दाखल असलेले नोंदणीकृत खरेदी खताची प्रत, ७/१२ उतारा, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे बिले विचारात घेतले असता वाद मिळकतीवर वादीचा प्रथमदर्शनी ताबा असल्याची बाब दिसून येते. त्यामुळे मी मुददा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्या क्र. २ व ३ करिता</u> :-**

**१४** मी मुददा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित असताना हे नमूद केलेली आहे की, वादी दाखल केलेल्या नोंदणीकृत खरेदी खत व ७/१२ उता-यावरुन वादीचा वाद मिळकतीवर प्रथम दर्शनी ताबा असल्याची बाब सिध्द होते. याउलट प्रतिवादीने वादी व द्वारकाबाई यांच्यामध्ये झालेले खरेदी खत हे कसे बेकायदेशीर आहे हे दर्शविण्याकरिता कोणताही पुरावा दिलेला नाही. वादीने प्रतिवादी हे त्याच्या वाद मिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळा निर्माण करत आहे हे दर्शविण्याकरिता यापूर्वी दाखल करण्यात आलेल्या दिवाणी दावा क्र. ४४३/२०१५ मधील दावा व नि. क्र. ५ वर पारित झालेल्या आदेशाची प्रत, अपील क्र. ३२/२०१६ मधील मा. जिल्हा न्यायालय, पंढरपूर यांच्या आदेशाची प्रत

अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये देखील प्रतिवादीतर्फे वादीच्या वाद मिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळा निर्माण होत असल्याची बाब नमूद करण्यात आलेली आहे. तसेच प्रतिवादी यांच्या वडिलांनी वादीच्या नांवे झालेल्या फेरफार क्र. ६५७२ ला मा. उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांच्याकडे अपील दाखल करुन आव्हान देण्यात आले होते. परंतु, सदरचे अपील हे नामंजूर करण्यात आलेले आहे. त्यामुळे अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहिले असता अनुकलतेचा कल हा प्रतिवादीपेक्षा वादीच्या बाजूने जास्त आहे. वादीच्या विनंतीनुसार जर तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा आदेश प्रतिवादी विरुध्द न दिल्यास प्रतिवादीमार्फत वादीच्या वाद मिळकतीवरील ताब्यास व वहितीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादीच्या कथनानुसार वाद मिळकतीमध्ये आज रोजी ऊसाची पिक असून सदर पिक हे कारखान्यास पाठविण्याकरिता असलेल्या रस्त्यामध्ये प्रतिवादीतर्फे हरकत अडथळा निर्माण होत आहे त्यामुळे सदरचे पिकाचे नुकसान होत आहे असे वादीचे कथन आहे. त्याबाबत त्यांनी स्वतःचे शपथ पत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्यामुळे सदर कथन विचारात घेतले असता, वादीच्या विनंतीनुसार मनाई हुकम न दिल्यास वादीचे निरसन न करता येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे मी मुददा क्र. २ व ३ चे उत्तर होकारार्थी व वादीच्या हक्कात देत आहे व मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## :: आदेश ::

०१ वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२ प्रतिवादी यानी मुळ दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत वादीच्या मालकी हक्कास, कब्जे वहिवाटीस, पाणी घेणेस, रस्त्याचे वापर उपभोगास, हक्कास, हरकत, अडथळा होईल, पिकाचे नुकसान होईल असे कोणतेही कृत्य स्वतः अगर इतरांमार्फत करु नये असा अंतरिम मनाई हुकुम प्रतिवादी विरुध्द देण्यात येत आहे.

०३ अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ.

( *अ. प्र. कराड* )
दि. १४.०८.२०१९. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पंढरपूर.

## ***Certificate***

| | | | |
|---|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : | Shri. R. R. Gunhal |
| b | Court | : | Jt. C.J.J.D.& J.M.F.C., Pandharpur. |
| **c** | Date of Judgment | : | 14.08.2019. |
| d | Judgment signed by P.O. On | : | 16.08.2019. |
| e | Judgment uploaded on | : | 16.08.2019. |